MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI,PUNE-17

# जगद्गुरू संत तुकाराम : जीवन व कार्य

– डॉ. राजेश त्र्यंबक बिराजदार

**प्रास्ताविक –**

तुकाराम महाराजांच्या घराण्यात त्याच्यांपूर्वी नऊ पिढ्याहून अधिक काळ पंढरीची वारी सुरू होती. तुकाराम महाराजांपासून आठवे पूर्वज विश्वंभरबाबा मोठे विठ्ठलभक्त होऊन गेले. विश्वंभरबाबांचे वडील लवकर निवर्तले. बाबांना मातेचा एकुलता एक आधार होता. निर्वाहासाठी वडिलोपार्जित वाणसामानाचे दुकान होते. ते त्यांना सांभाळावे लागले. चोख व्यवहार, प्रामाणिकता, साधुसंत, ब्राह्मण, अतिथीचा सन्मान, दानधर्म देणे अशी त्यांची वृत्ती होती. हा प्रपंच कारभार बाबांचा दिनक्रम पाहून त्यांच्या आईला समाधान वाटे. विश्वंभरबाबाच्या पत्नीचे नाव आमाबाई होते. एकदा त्यांच्या आईने त्यांना सांगितले की, ''तुझ्या वडिलोवडिली निर्धारी । चालविली पंढरीची वारी ।। त्याची सर्वथा अंतर न करी । तरीच संसारी सफळपण ।।

**तुकारामांचे बालपण –**

पिता बोल्होबा व जननी कनकाई यांच्या पोटी शके १५३० मध्ये तुकारामाचा जन्म झाला. त्यांच्या नंतर कान्होबा तुकारामाच्यापूर्वी सावजी अशी तीन मुले या दांपत्याला झाली. बोल्होबा व कनकाई या तीन मुलांसह आपल्या संसारात सुखी होते. बोल्होबांनी कुळदेव श्रीविठ्ठलाची सप्रेम उपासना, पंढरीची– आषाढी कार्तिकीची वारी सतत चाळीस वर्षे केली. दानधर्म, परोपकार, भूतदया, भजन, कीर्तन, नाम:स्मरण हा त्यांचा आचार धर्मच होता. प्रपंच व्यवहार करिता । तेथेच बोले असत्य सर्वथा ।। असा त्यांचा स्वभाव होता. सावकारकी, व्यापारधंदा, शेतीवाडी असा उद्योग त्यांनी प्रपंचासाठी केला. ते प्रपंचातही दक्ष होते. सावजीच्या पाठीवर दुसरा मुलगा झाला तेच तुकाराम महाराज. तुकोबांची वयाची पहिली तेरा वर्षे मोठ्या आनंदात गेली. लहाणपणी मित्र जमवून त्यांच्याशी खेळण्याचा छंद त्यांनी जोपासला. श्रीकृष्णाच्या व गोपाळांच्या बाललीलांचे वर्णन याशिवाय विविध खेळांचे रुपक त्यावरील अभंग मोठ्या आवडीने केले आहेत. टिपऱ्या, चेंडू, मृदूंग, हुतुतू, विटीदांडू, हमामा, हुंबरी इ. खेळात ते पारंगत होते.

वयाच्या १३ व्या वर्षीच तुकोबारायांनी संसाराचा सर्व भार उचलला.

तुकोबारायांचा उत्तम चाललेला संसार पाहून माता-पित्यांना आनंद झाला, पण लवकरच दोघेही वैकुंठवासी झाले. माता-पित्यांच्या चिरवियोगामुळे सर्वांनाच अतिशय दुःख झाले. त्यात काही काळातच सावजींची पत्नीही वारल्यामुळे आणि सावजींची वृत्ती मुळातच उदासीन असल्यामुळे ते तीर्थाटनाला निघून गेले. वयाच्या १७ व्या वर्षी आई-वडिलांचे छत्र गेल्याकारणाने सर्व संसाराची जबाबदारी तुकोबारायांवर येऊन पडली. संसाराची जबाबदारी पेलत असताना सर्वांच्याच जीवनामध्ये अडीअडचणी येतात. तुकोबारायांच्या जीवनामध्येही ऊन-पावसाळाचा खेळ सुरू झाला. संसाराची चक्रे उलट फिरू लागली. सूर्याच्या उष्णतेने जमिनीवरचे पाणी आटते तसे संसाराच्या तापामुळे होते ते धन संपून गेले. दैनंदिन खर्च चालूच होता पण व्यापार मात्र नीट चालत नव्हता. मेहनत घेऊन तुकोबाराय धंदा करू लागले पण कोठे यश दिसेना. कर्ज काढून प्रपंच करण्याचा प्रयत्न केला तोही असफल झाला. तुकाराम महाराज म्हणतात, 'संसारतापें तापलो मी देवा । करिता या सेवा कुटुंबाची ।' या अनुभवामुळे त्यांनी पुर्वीपेक्षाही अत्यंत अट्टाहासाने प्रभूचे भजन सुरू केले. धंदा-उद्योग करत असतानाही महाराजांच्या मुखामध्ये सतत हरिचे नाम होते. तुकाराम महाराजांच्या संसाराला उतरती कळा लागल्यानंतर अनेकांनी त्यांना उपदेश करण्याची संधी सोडली नाही. तुकाराम महाराजांना त्यांनी भजनाचा नाद सोडून देण्याचा सल्ला दिला. तसे न कराल तर अजूनही ऋणात अडकाल असे सांगितले. आजूबाजूच्या लोकांचे ऐकून घरातल्या स्त्रियाही तसेच बोलू लागल्या. संसारात जसे जसे नुकसान होऊ लागले तसतशी परमार्थाची ओढ वाढत गेली. या अनुरोधानेच तुकाराम महाराज म्हणतात,

**शिवाजी महाराज यांची भेट –**

देहू, लोहगाव इत्यादी मावळ विभागात तुकोबाचे स्वधर्म प्रतिष्ठापणेचे कार्य लोकोद्धाराच्या तळमळीने चालू होते. तुकोबांचे हे कार्य विविध अंगानी बहरत होते. 'धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हासी ।' त्या वेळी हिंदवी स्वराज्य श्री ने आम्हास दिले आहे. हिंदू धर्म रक्षणासाठी आम्ही फकिरी घेतली आहे, हे शिवरायांचे ध्येय. दोघांचेही ध्येय एकच. राष्ट्राचा विकास आणि मोक्ष दोन्ही कार्ये धर्मरक्षणानेच होतात. ब्रह्मतेज व क्षात्रतेज दोन्ही प्रकट आणि परस्परांना पूरक झाली तर राष्ट्राचा विकास सूर्योदय पावतो. शिवरायांना साधुपुरुषाविषयी फार आदर असल्याने आणि तुकोबांची कीर्तने ऐकून आदर वाढल्यामुळे तुकोबा लोहगावास असताना दिवट्या, छत्री, घोडे काही कारकुनाबरोबर या इतमामासह काही धनही पाठवले व तुकोबांना पुण्यास येण्याचे निमंत्रणही दिले. पण तुकोबांनी कशाचाही स्वीकार केला नाही. त्यांनी धनजवाहिरे यांच्याकडे न पाहता सर्व तसेच शिवरायांकडे परत पाठविले व सोबत नऊ अभंगाचे पत्र लिहिले.

तुकोबांची ज्ञानेश्वरांवरील निष्ठा – तुकोबारायांनी पराकाष्ठेच्या प्रेमाने ज्ञानोबारायांना पितृस्थानी बसविले. एकदा एका ब्राह्मणाने ज्ञानेश्वरांनी दृष्टान्त व उपदेश द्यावा या उद्देशाने आळंदीला ज्ञानदेव समाधीजवळ ४५ दिवस उपोषण केले. ब्राह्मणाला एके दिवशी तुकोबांकडे जाण्याचा दृष्टान्त झाला, तो देहूला तुकारामांकडे आला. त्याने दृष्टान्ताची गोष्ट सांगितली. तुकोबांनी त्याला नामस्मरण, भक्ती व मोक्षप्राप्तीसाठी देवाला शरण जाण्याचा उपदेश केला. माझ्या बापाने ज्ञानदेवाने मला जो ज्ञानाचा खाऊ दिला त्यातला थोडा मी तुला दिला आहे. तो घेऊन आपल्या ठिकाणी महाराज ज्ञानदेवांच्या सहवासात (आळंदी) राहा म्हणजे तुमच्या चरणाचे वंदन करण्यास मी येईन. ( अ. २३३२) ज्ञानेश्वरानां तुकोबा म्हणतात, ज्ञानीयांचा राजा गुरुमहाराव । म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे ।। मज पामराशी काय थोरपण । पायीची वहाण पायी बरी । ( अ. २३३३) आपण ज्ञानीयांचे महाराज तेव्हा तुमचा थोरपणा मला कसा येईल? तुमच्या युक्तिवादाची माझ्या ठिकाणी नाही म्हणून मी तुमच्या चरणावर मस्तक ठेवतो.

बोलीली लेकुरे । वेडी वाकुडी उत्तरे । करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध । नाही विचारीला । अधिकार मी आपुला ।। तुका म्हणे ज्ञानेश्वरा। राखा पायापेकिंकरा ।। (अ. २३३४)

**तुकोबांची अभंगरचना –**

तुकोबांनी 'यातीशुद्र वैश्य केला व्यवसाय' या अभंगात आपले स्वतःचे चरित्र अगदी थोडक्यात सांगितले आहे. स्वप्नात गुरुपदेश झाला. त्यानंतर त्यांना कवित्वस्फुर्ती झाली. तेव्हापासून अखेरपर्यंत अभंगवाणी रचनेचा प्रवाह अखंड चालू होता. आज तुकोबाचे साडेचारहजार अभंग उपलब्ध आहेत. विद्येची परंपरा असलेल्या कुळात आपला जन्म झाला नाही. शास्त्राध्ययन केले नाही. त्यामुळे आपली कवित्वरचना संतांची उच्छिष्टे, ईश्वराचे वरदान, प्रसादाची वाणी आहे असे तुकोबा म्हणतात.

**तुकोबांचा निदिध्यास –**

तुकोबांना वैकुंठाला जाण्याचा निदिध्यास लागला होता. ते प्रत्यक्ष पुरुषोत्तम शंखचक्रगदापद्म धारण केलेले श्यामवर्ण श्रीहरी गरुडावर बसून आपल्या घरी येत आहेत असे तुकोबांनी डोळे भरून पाहिले. ते तुकोबाला 'भक्तराया भिऊ नकोस असे अभय देत आहेत. असा निर्गुण परमात्मा तुकोबांना दर्शन देण्यासाठी सगुण साकार झाला आणि वैकुंठावरून गरुडावर बसून आला. भगवंताचे ते दिव्य सगुणसर्वांना तुकोबांचा ''विठ्ठल विठ्ठल नामघोष ऐकू येत होता पण त्यांना देह दिसत नव्हता. सर्व मंडळी स्वप्नातून जागे झाल्याप्रमाणे पाहू लागली. तुकोबा पहाता पहाता गुप्त झाले. 'त्यांची काया दिव्य झाली' दिव्य देहाने तुकोबा